RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक १५]  सोमवार, मार्च ३०, २०२०/चैत्र १०, शके १९४२  [पृष्ठे २ किंमत : रुपये २३.००

### असाधारण क्रमांक २५

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.—** सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . . . | पृष्ठे १-२ |

दिनांक २० मार्च २०२० रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**राजेन्द्र ग. भागवत,**
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ३० मार्च २०२० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ अधिनियम, २०१७ यामध्ये सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

२०१७ चा महा. ३७.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ अधिनियम, २०१७ यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२० असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या दीर्घ शीर्षाची सुधारणा.

**२.** सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ अधिनियम, २०१७ (यात यापुढे, ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या दीर्घ शीर्षामधील, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल. २०१७ चा महा. ३७.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या उद्देशिकेची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या उद्देशिकेमधील " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम १ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १ मधील, पोट-कलम (१) मध्ये, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम २ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम २ मधील, खंड (एकोणतीस) मध्ये, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील,–

(१) पोट-कलम (१) मध्ये, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (५) मध्ये, " मुक्त " या शब्दाऐवजी " व्यावसायिक " हा शब्द दाखल करण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.